**रे. दि. मु. क्रमांक ८२/२०१२ मधील नि.क्र. ५४ खालील आदेश.**
**रविंद्र सोनवणे व इतर -विरुध्द- मोहन देडे व इतर**
**आदेश पारित दिनांक ०१.०२.२०२३**

---

वादीतर्फे प्रस्तूतचा अर्ज मयत प्रतिवादी क्र. १ श्री. मोहन गणपत देडे यांचे वारस कायदेशीर वारस म्हणून अभिलेखावर नोंद होणेकरिता दाखल केलेला आहे. सदर अर्जासहीत सदर अर्जासहीत वादीचे वारस श्री. रविंद्र बाबूराव सोनवणे यांचे निशाणी क्र. ५५ वर सत्यप्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल केले आहे.

०२. प्रस्तूत अर्जामध्ये असे कथन करणेत आले आहे की, सदरचा दावा चालू असताना या दाव्यातील प्रतिवादी क्र. १ श्री. मोहन गणपत देडे हे दिनांक २९.०७.२०२२ रोजी मयत झाले आहेत. प्रस्तूत अर्जात नमूद केलेनुसार मयत प्रतिवादी क्र. १ यांना वारस क्र. १-अ ते १-ई असे एकूण सहा कायदेशीर वारस आहेत. उपरोक्त नमूद वारसांची नोंद अभिलेखावर व्हावी, तसेच, प्रस्तूतची दुरुस्ती ही किरकोळ स्वरुपाची असून त्यामुळे दाव्याच्या सरनाम्यामध्ये कोणताही बदल होत नाही. करिता मयत प्रतिवादी क्र. १ मोहन देडे यांच्या वारसांच्या नावांची नोंद अभिलेखावर व्हावी अशी विनंती करणेत आली आहे.

०३. सदरकामी, प्रतिवादीतर्फे असे म्हणणे दाखल की, वादीचा सदरचा अर्ज रक्कम रुपये १,०००/- कॉस्ट करून मंजूर करण्यात यावा.

०४. वादीचे प्रस्तूत अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. १ श्री. मोहन गणपत देडे हे दिनांक २९.०७.२०२२ रोजी मयत झाले आहेत. प्रस्तूत अर्जात नमूद केलेनुसार मयत प्रतिवादी क्र. १ यांना वारस क्र. १-अ ते १-ई असे एकूण सहा कायदेशीर वारस आहेत. सदर दाव्याचा गुणदोषावर निकाल देणेकामी प्रतिवादी क्र. १ श्री. मोहन गणपत देडे यांचे नावाच्या पुढे 'मयत' असे लिहून त्यांचे वारस अभिलेखावर घेणे न्यायोचित होईल. सदर दावा परिणामकारकरित्या निकाली करणेसाठी मयत पक्षकारांचे सर्व कायदेशीर वारसदार हे अभिलेखावर नमूद होणे आवश्यक आहे. परंतु, सदरचा अर्ज दाखल करणेस वादीस ५ महिने, ८ दिवसांचा विलंब झाल्याने प्रस्तूत अर्जावर कॉस्टची आकारणी करणे हे नैसर्गिक न्याय तत्वाच्या दृष्टीने योग्य वाटते. सबब, खालील आदेश पारित करीत

आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | वादीचा निशाणी क्र. ५४ चा अर्ज रक्कम रुपये २००/- (अक्षरी रक्कम रुपये दोनशे फक्त) इतक्या कॉस्टचे आकारणीवर मंजूर करणेत येतो. सदर कॉस्टची रक्कम तालुका विधी सेवा समिती, खंडाळा येथे जमा करावी. |
| २. | वादी यांनी त्यांच्या अर्जामध्ये नमूद केलेली दुरुस्ती विहीत कालावधीमध्ये करावी व त्याप्रमाणे दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करणेत यावी. |
| ३. | सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी. |

(अ. क. दामटे)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, खंडाळा.

दिनांकः- ०१.०२.२०२३